MHNG020006312026

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | :- | ०४.०२.२०२६ |
| नोंदणी दिनांक | :- | ०६.०२.२०२६ |
| निकाल दिनांक | :- | २८.०७.२०२६ |
| कालावधी | :- | वर्ष महिने दिवस |
| | | ०० : ०५ : २५ |

**विद्यमान ४थे सह दिवाणी न्यायालय क.स्तर नागपूर जिल्हा-नागपूर**
**(पिठासीन अधिकारी आर. के. गायकवाड)**
**(दिनांक २८-०७-२०२६)**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६४/२०२६** **निशाणी क्र.९**

१. **श्रीमती केवरीबाई किशन सोनकतरी,**
वय ६६ वर्षे, व्यवसाय -गृहिणी,
राहणार- प्लॉट नं. ४७७,बजरंग चौक, रामसात किराणा
दुकान जवळ, डिप्टी सिंगनल, संजय नगर, पारडी,
भांडेवाडी, नागपूर-४४००३५

२. **पवन किशन सोनकतरी,**
वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजदुरी,
राहणार- प्लॉट नं. ४७७,बजरंग चौक, रामसात किराणा
दुकान जवळ, डिप्टी सिंगनल, संजय नगर, पारडी,
भांडेवाडी, नागपूर-४४००३५

३. **कमलेश किशन सोनकतरी,**
वय ४२ वर्षे, व्यवसाय -मजदुरी,
राहणार- प्लॉट नं. ४७७,बजरंग चौक, रामसात किराणा
दुकान जवळ, डिप्टी सिंगनल, संजय नगर, पारडी,
भांडेवाडी, नागपूर-४४००३५

४. **श्रीमती गिता रोशन सोनगडे (लग्ना नंतरचे नाव)**
**श्रीमती गिता किशन सोनकतरी (लग्ना आधीचे नावे),**
वय ३८ वर्षे, व्यवसाय -खाजगी, राहणार- वार्ड नं. १,
पोस्ट मनसर, ता. रामटेक, जि. नागपुर- ४४१४०१ **....अर्जदार**

**विरुध्द**

**निरंक** **....गैरअर्जदार**

**अर्जदारातर्फे विधिज्ञ -** **श्रीमती अश्वीनी साखरे**

**अर्ज –** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारसा दाखल प्रमाणपत्र मिळणेबाबत...

## निकालपत्र
## (दिनांक २८ जुलै, २०२६ )

अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज सादर केला आहे.

**अर्जदारांचे कथन खालीलप्रमाणे –**

२. अर्जदार क्र.१ ही मयत किशन रामग्यान सोनकतरी यांची विधवा पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयत किशन रामग्यान सोनकतरी यांची मुले व अर्जदार क्र. ४ ही मयत किशन रामग्यान सोनकतरी यांची मुलगी आहे. किशन रामग्यान सोनकतरी यांचा मृत्यु इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर येथे दिनांक २२.०९.२०२५ रोजी झाला. अर्जदा क्र. १ ते ४ हे त्यांच्या मृत्युपश्चात त्यांचे एकमेव वारस आहे. अर्जदार हे कायमस्वरूपी नागपुर येथे स्थायीक आहे.

३. मयत किशन रामग्यान सोनकतरी यांच्या मृत्यु कुठलेही मृत्युपत्र न करता झाला असल्याने त्यांच्या सर्व मालमत्तेकरीता अर्जदार एकमेव वारस आहेत. त्यामुळे शासकिय व निमशासकीय विभागामध्ये मागितल्याप्रमाणे पुर्तता करण्याकरीता व इतर खाजगी कामाकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुतचा

अर्ज त्यांना वारस दाखला देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. त्यानंतर साईटेशन व पेपर पब्लीकेंशनचा निशाणी १ वर आदेश करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणामध्ये कोणीही हजर झाले नाहीत व हरकत घेतली नाही.

५. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी उदभवलेले मुददे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत किशन रामग्यान सोनकतरी यांचे कायदेशिर आणि सरळ वारस आहेत हे शाबित केले आहे काय ? | **होय.** |
| २ | अंतिम आदेश काय ? | **अर्ज मंजुर** |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांक १ :–**

६. अर्जदार यांनी अर्जातील कथने शाबीत करण्याकरीता अर्जदार क्र. ३ कमलेश किशन सोतकतरी यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.७) अन्वये दाखल केलेले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केल्याप्रमाणे, मयत किशन रामग्यान सोनकतरी यांच मृत्यु प्रमाणपत्र (निशाणी पी–१/पी.डब्ल्यु–१), वडील मयत किशन रामग्यान सोनकतरी यांचे आधार कार्ड (निशाणी पी–२/पी.डब्ल्यु–१), आई अर्जदार क्र. १ केवरीबाई किशन सोनकरती यांचे आधार कार्ड (निशाणी पी–३/पी.डब्ल्यु–१), भाऊ पवन किशन सोनकतरी यांचे आधार कार्ड (निशाणी पी–४/पी.डब्ल्यु–१), स्वता:चे

आधार कार्ड (निशाणी पी–५/पी.डब्ल्यु–१), बहिण अर्जदार क्र. ४ यांचे आधार कार्ड (निशाणी पी–६/पी.डब्ल्यु–१), तसेच दिनांक ०५.०४.२०२६ रोजीची पुण्यनगरी पेपरमधील नोटीसाची स्कॅन प्रत (निशाणी पी–७/पी.डब्ल्यु–१) अशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदारानी निशाणी क्र.८ अन्वये पुर्सिस दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

७. अर्जदारचे सरतपासाचे आणि दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराचे अर्जास न्यायालयात हजर होवून कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदार यांना वगळता इतर कोणीही मयत किशन रामग्यान सोनकतरी यांना वारस आहेत असा पुरावा रेकॉर्डवर आलेला नाही. त्यामुळे मयत किशन रामग्यान सोनकतरी यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे हिंदु सक्सेशन ॲक्ट १९५६ चे कलम ८(a) मधील नात्याप्रमाणे व परिच्छेद वर्ग–१ प्रमाणे कायदेशिर आणि सरळ वारस आहेत हे अर्जदार क्र. ३ यांनी निशाणी क्र. ७ वरील शपथपत्रानुसार शाबीत केलेले आहे. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ –</u>

८. अर्जदार क्र. १ ते ४ मयत किशन रामग्यान सोनकतरी यांचे कायदशिर व सरळ वारस आहेत हे अर्जदारांनी शाबीत केलेले आहे. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब मुद्दा क्रमांक २ करीता मी खाली आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत किशन रामग्यान सोनकतरी यांचे कायदेशिर व सरळ वारस आहेत असे जाहीर करण्यात येते.

**२.** अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत किशन रामग्यान सोनकतरी यांचे कायदेशिर व सरळ वारस असल्याबाबतचा दाखला महाराष्ट्र कोर्ट फी अधिनियम, १९५९ मधील परिच्छेद–१, आर्टिकल–१ नुसार रक्कम रूपये २००/– न्यायिक मुद्रांक व शुल्क दिल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

**३.** अर्जदारांना अर्जासमवेत दाखल केलेले मुळ कागदपत्रे/दस्तऐवज सिव्हील मॅन्युअल चॅप्टर २७ रुल ५२७ (१) प्रमाणे परत करण्यात यावेत.

RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Judgment
Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2026.07.28 15:59:32 +0530

दिनांकः– २८.०७.२०२६ (राहूल के. गायकवाड)
ठिकाणः– नागपूर. ४ थे सह दि.न्या.क.स्तर तथा
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.